# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या २०४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.२६ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११: ०० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०४ वी बैठक **शुक्रवार, दि.२६ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १७) | डॉ. अजयकुमार जाधव<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर या पदावर नव्याने रुजू झालेले डॉ. अजयकुमार जाधव यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि.२५ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२५ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. ८ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | पात्रता विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी प्रति विद्यार्थी रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) शुल्क आकारण्यास व विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा रू.३००/- (रुपये तीनशे फक्त) ज्यादा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी प्रति विद्यार्थी रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) शुल्क आकारण्यास व विद्यापीठाकडून संलग्नित महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा स्वायत्त महाविद्यालयाकडून रू.३००/- (रुपये तीनशे फक्त) ज्यादा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. ९ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | आरोग्य केंद्र |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून "जोडीदाराची विवेकी निवड" हा कार्यक्रम राबविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून "जोडीदाराची विवेकी निवड" हा कार्यक्रम राबविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्यास व उपक्रमाची उद्दिष्टास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१) प्रेम आणि आकर्षण यातील फरक लक्षात घेणे.<br>२) बौध्दिक, भावनिक, मूल्यात्मक व लैगिंकता विषयक अनुरुपता पाहणे.<br>३) हुंडा, व्यसनाला ठाम नकार देणे, वैज्ञानिक माहिती देवून त्याबाबत सम्यक विचार कसा केला पाहिजे ते सांगणे.<br>४) लग्न साधेपणाने म्हणजे किमान कर्ज न काढता करणे. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | १) दि.२४ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.२५ जुलै, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>३) दि.०८ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०२ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि.२४ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२) दि.२५ जुलै, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>३) दि.०८ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०२ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अधिसभेची ३६ वी बैठक दि.०३ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीची सूचना दि.१७ सप्टेंबर, २०२५ रोजी सर्व सदस्यांना पाठविण्यात आली असून दि.०३ जुलै, २०२३ रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पत्रानुसार, अधिसभा सदस्यांनी बैठकीसाठी प्रश्न, प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख दि.२२/०९/२०२५ रोजी सायं. ०६:०० पर्यंत आहे. त्यानुसार अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता पाठविलेल्या प्रश्नांची उत्तरे कार्यालयाकडून तयार करुन २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **तक्रार निवारण समितीकडे तक्रार सादर करावयाच्या तक्रार अर्जामध्ये तक्रार निवारण समितीने योग्य त्या दुरुस्त्या सुचविल्या नुसार तो नमुना तक्रार अर्ज व्यवस्थापन परिषदेची मान्यतेसाठी केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: तक्रार निवारण समितीकडे सादर करावयाचा सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या अर्जामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक असल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या अर्जामध्ये समितीने विविध बाबींचा विचार करुन तक्रार निवारण समितीकडे सादर करण्यात येणाऱ्या तक्रार अर्जामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत. सदर दुरूस्तीसह तयार करण्यात आलेल्या तक्रार अर्जास मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळण्याकामी व मान्यतेअंती सदर अर्ज संबंधितांना उपलब्ध करुन देण्याबाबत दि.१२/०८/२०२५ रोजी खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे. (यापूर्वीच्या तक्रार अर्जाची प्रत व तक्रार निवारण समितीने दुरूस्त केलेल्या तक्रार अर्जाची प्रत सोबत जोडलेली आहे.<br>ठराव: तक्रार निवारण समितीकडे सादर करावयाचे अर्जामध्ये योग्य ते दुरुस्ती होण्याबाबतचा विषयाच्या अनुषंगाने यापूर्वी चर्चा होऊन त्यामध्ये समितीने सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदर दुरुस्ती स्वीकारुन यापुढे तक्रार निवारण समितीकडे सोबत जोडण्यात आलेला प्रस्तावित तक्रारी अर्जानुसार अर्ज सादर करण्यात यावे व याबाबत अर्ज अंतिम करण्याची शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेस करण्याचे सर्वानुमते ठरले.<br>सबब, तक्रार निवारण समितीने तक्रार वर नमूदप्रमाणे केलेली शिफारस विचारार्थ. | तक्रार निवारण कक्ष |
| ठराव: | **तक्रार निवारण समितीकडे तक्रार सादर करावयाच्या तक्रार अर्जामध्ये तक्रार निवारण समितीने योग्य त्या दुरुस्त्या सुचविल्यानुसार नमुना तक्रार अर्जास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**१) नमुना तक्रार अर्जातील अ.क्र. ८ मध्ये प्राचार्य/संस्था/विद्यापीठ यांची संपूर्ण माहिती भरण्यासाठी अधिकची जागा ठेवावी.**<br>**२) नमुना तक्रार अर्जातील अ.क्र.१० मध्ये अ.क्र. १), २), ३) व ४) ऐवजी अ.क्र. अ), ब), क) व ड) असे नमूद करणे.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील १० एकर परिसरामध्ये पेरणी करण्यात आलेल्या उडीदाच्या शेतीमधील उडीद स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरापैकी २० एकर परिसरामध्ये तूर व उडीद माहे जून मध्ये पेरणी करण्यात आली होती. त्यापैकी १० एकर परिसरामध्ये उडीदाची लागवड करण्यात आले होते. पावसाळा जास्त असल्याने उडीद पीक बराच भाग पाण्याखाली गेल्यामुळे खराब झालेला आहे. उर्वरित चांगला राहिलेल्या पीकाची काढणी करण्यात आलेली आहे. काढणी करण्यात आलेल्या उडीदाची रास करण्यात आलेली आहे. रास केलेल्या उत्पन्न १० पॅकेट झाले असून अंदाजे ६० ते ६५ किलो वजनाचे असून त्याचे वजन एकूण ६०० ते ६५० किलो इतके होत असून ते सद्यस्थितीत स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करणे आवश्यक आहे.<br>सबब, सदरचे काढण्यात आलेल्या उडीदाचे उत्पादन विक्री करणे आवश्यक असल्याने काढण्यात आलेले उडीद स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्यास तसेच विक्री करुन प्राप्त झालेली रक्कम विद्यापीठ फंडामध्ये जमा करुन घेण्याची बाब विचारार्थ. | राष्टीय सेवा योजना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील १० एकर परिसरामध्ये पेरणी करण्यात आलेल्या उडीदाच्या शेतीमधील उडीद स्थानिक बाजारपेठेमध्ये बाजारभावाने विक्री करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान संकुला अंतर्गत Diploma in Emergency Medical Services हा कौशल्याधारित अभ्यासक्रम यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करुन सुरु करणेबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुलास सोलापुरातील यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याकडून Diploma in Emergency Medical Services हा नविन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रस्तुत संकुलाने कौशल्य विकास केंद्राकडे टिपणी व प्रस्ताव पाठवून अभिप्राय मागितला होता. त्यावर कौशल्य विकास केंद्राने सदर अभ्यासक्रम कौशल्य विकास केंद्राच्या सामंजस्य करार नियमावली नुसार शैक्षणिक सहचर्य करार करुन सुरु करता येईल व त्यानुसार कार्यवाही करावी असा अभिप्राय दिला होता. कौशल्य विकास केंद्राच्या सामंजस्य करार नियमावलीनुसार प्रस्ताव सादर केलेल्या यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याकडे सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सोयी सुविधा आहेत की नाहीत हे तपासून घेण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी त्रिसदस्यीय समितीचे नामनिर्देशन केलेले होते. सदर समितीने यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन सदर संस्थेत हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सोयी सुविधा आहेत असा चौकशी अहवाल सादर केलेला होता. तदनंतर प्रस्तुत संकुलाने यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करण्यासाठी सदर कराराचा मसूदा तयार करुन तो MoU सेलकडे तपासून घेण्यासाठी पाठवला होता. MoU सेलने सदर मसूदा तपासून त्यात काही बदल सुचवले होते त्यानुसार MoU सेलने सुचवलेले बदल करुन संकुलाने यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याशी शैक्षणिक साहचर्य करार करुन Diploma in Emergency Medical Services हा कौशल्याधारित अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यासाठी कराराचा मसूदा अंतिम केलेला आहे. सदर अभ्यासक्रम पूर्णपणे नवीन असा कौशल्याधारित अभ्यासक्रम असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सदर अभ्यासक्रम सुरु करावयाचा आहे परंतु तत्पूर्वी सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विद्या परिषदेची मान्यता घेऊन तदनंतर MoU करण्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव ठेवावी लागणार असल्याने सदर बाब मा. विद्यापरिषदेच्या दि.२६ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेली बैठकीत ठेवलेला होता. त्यावर मा. विद्यापरिषदेने चर्चा करुन प्रस्तुत विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत Diploma in Emergency Medical Services हा कौशल्य आधारित अभ्यासक्रम यशोधरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करुन सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता दिली आहे. | आरोग्य विज्ञान संकुल |

सदर प्रस्तावित अभ्यासक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of the Program | Eligibility for Admission | Duration | Intake | Fees per student |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Diploma in Emergency Medical Services | MBBS, BAMS, BHMS | 1 YEAR | 50 | Rs.25,000 |

Diploma in Emergency Medical Services (EMS) हा नाविन्यपूर्ण असा कौशल्याधारित अभ्यासक्रम असून कोणत्याही वैद्यकीय शाखेचा पदवीधर (MBBS, BAMS, BHMS) त्यास प्रवेश घेऊन शकतो. सद्यस्थितीत हा अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयात शिकवला जात नाही. सोलापूर शहर जिल्हयातच नव्हे तर आजूबाजूच्या कर्नाटक, तेलंगाना राज्यातील सीमावर्ती जिल्हयातील इच्छुक विद्यार्थी हा अभ्यासक्रम शिकण्यासाठी पुणे अथवा मुंबई येथे जात असतात. हा अभ्यासक्रम पुण्यातील भारती विद्यापीठ, सिबयोसीस विद्यापीठ तसेच मुंबईतील टाटा इंस्टिटयुट ऑफ सोशन सायन्स अशा संस्थामधून चालविला जातो व सोलापूरातील अनेक विद्यार्थी त्यास प्रवेश घेतात. जर हा अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठात सुरु झाला तर सोलापूर शहर व जिल्हयातील विद्यार्थ्यांना बाहेरगावी जायची गरज उरणार नाही.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान संकुला अंतर्गत Diploma in Emergency Medical Services हा कौशल्याधारित अभ्यासक्रम यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करुन सुरु करणेबाबतची बाब विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान संकुला अंतर्गत** Diploma in Emergency Medical Services **हा कौशल्याधारित अभ्यासक्रम यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल सोलापूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करुन सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**तसेच करारामधील ६.** Terms and Conditions **मधील ६.३ मध्ये** "This MoU shall remain in effect initially for three years" **ऐवजी** "This MoU shall remain in effect initially for Five years" **अशी दुरुस्ती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ (१)] | प्रस्तुत विद्यापीठामधील सर्व विभागाकडे उपलब्ध असणारे कागदपत्र जे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे असे सर्व कागदपत्रे Scanning, ICR, OCR Digitization of students Marksheet याकरिता यापूर्वी निविदा मागविण्यात आली होती. तथापि सदरच्या निविदेची प्रक्रियेअंति मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावानुसार संबंधीत फर्मला दिलेल्या परीक्षेच्या कामकाजाच्या यशस्वीतेचा आढावा घेऊन नंतर या ठरावाबाबत निर्णय घ्यावा, तोपर्यंत सदरचा ठराव तहकूब करण्यात यावा यामुळे पुरवठा आदेश स्थगित ठेवण्यात आलेला होता. सदरच्या निविदेचा वैधता कालावधी दि. १ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपलेला असल्यामुळे संबंधीत कामाकरिता पुन:श्च नव्याने ई निविदा मागविण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील कामकाजात ICT चा उपयोग करण्यासंदर्भात श्री. राजेश अग्रवाल समितीने सुचविलेल्या उपाय योजनेनुसार परीक्षेच्या कामाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून विद्यापीठामधील सर्व विभागाकडे उपलब्ध असणारे कागदपत्र जे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे असे सर्व कागदपत्रे Scanning, ICR, OCR Digitization of students Marksheet याकरिता ईनिविदा मागविण्याकरिता मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली होती. प्राप्त ई निविदा वर कार्यालयीन कार्यवाही करुन त्याचा तौलनिक तक्ता करुन न्यूनतम दरामध्ये काम करुन देणाऱ्या पूरवठाधारकाचे नाव अंतिम करुन सदरचा तौलनिक तक्ता दि.६/१२/२०२४ रोजीच्या वित्त व लेखा समिती च्या बैठकीत ठेवण्यात आला. वित्त व लेखा समितीच्या शिफारसीस अनुसरुन सदरचा प्रस्ताव हा खरेदी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला. दि.६/१२/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीसमोरी कार्यवृत्तांत मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता ठेवण्यात आला.<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि.९/१२/२०२४ रोजीच्या बैठक क्र.१८९ मध्ये ठेवण्यात आलेल्या विषय क्र.५ अनुसार सदरच्या प्रस्तावामध्ये नमूद विद्यापीठामधील सर्व विभागाकडे उपलब्ध असणारे कागदपत्र जे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे असे सर्व कागदपत्र Scanning, ICR, OCR Digitization of students Marksheet and Web Portal Development या करिता न्यूनतम दर असलेल्या M/s Edulab Educational Exchange Pvt. Ltd. Mumbai या फर्मला पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येत असल्याचा ठराव करण्यात आला.<br>तथापि तद्नंतर दि.२७ जानेवारी २०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठक क्र.१९१ मध्ये दि.९/१२/२०२४ रोजी मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील विषय क्र.५ ला अनुसरुन M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |

| | | |
|---|---|---|
| | Mumbai या फर्मला पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आल्याचा ठराव करण्यात आला होता त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली व नवीन सुधारित ठराव करण्यात आला ज्यानुसार M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd. Mumbai या फर्मला दिलेल्या परीक्षेच्या कामकाजाच्या यशस्वीतेचा आढावा घेऊन नंतर या ठरावाबाबत निर्णय घ्यावा, तोपर्यंत सदरचा ठराव तहकूब करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>उपरोक्त प्रमाणे दि.२७ जानेवारी, २०२५ च्या मा. व्यवस्थापन परिषदेतील बैठकीच्या ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठातील Scanning, ICR, OCR Digitization of students Marksheet and Web Portal Development या कामाचा पुरवठा आदेशास स्थगिती देण्यात आलेली आहे.<br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, Edulab या कंपनीमार्फत परीक्षा विभागाशी संबंधीत असणारे विद्यार्थ्यांचे Result Process, Ledger Generation, Marksheet Generation, Various Certificate Generation इ. प्रकारची कामे सद्यस्थितीमध्ये सुरळीतपणे सुरु आहेत.<br>शासनाकडून सर्व कृषी व अकृषी विद्यापीठांना विद्यापीठातील परीक्षेचा अंतिम निकालाचा संपूर्ण डेटा शासनाच्या संगणकप्रणालीमध्ये अपलोड करण्याविषयी कळविण्यात आले आहे. प्रस्तुत विद्यापीठाचा परीक्षा विभागाकडील विद्यार्थ्यांचा परीक्षासंदर्भातील निकालाचा डेटा, मार्कशीट या शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.<br>दि.१ डिसेंबर, २०१६ रोजीच्या खरेदीसाठीची कार्यपध्दती सुधारित नियमावलीबाबतच्या शासन निर्णयानुसार निविदेचा वैधता कालावधी साधारणपे ६०-१२० दिवसांच्या कालावधीकरिता असावी, परंतु अपवादात्मक परिस्थितीत १८० दिवसापेक्षा जास्त नसावी असे नमूद आहे. उक्त शासन निर्णयानुसार उक्त निविदेचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे उपरोक्त कामाकरिता नव्याने ई-निविदा मागविण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठामधील सर्व विभागाकडे उपलब्ध असणारे कागदपत्र जे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे असे सर्व कागदपत्रे Scanning, ICR, OCR Digitization of students Marksheet याकरिता यापूर्वी निविदा मागविण्यात आली होती. तथापि सदरच्या निविदेची प्रक्रियेअंति मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावानुसार संबंधीत फर्मला दिलेल्या परीक्षेच्या कामकाजाच्या यशस्वीतेचा आढावा घेऊन नंतर या ठरावाबाबत निर्णय घ्यावा, तोपर्यंत सदरचा ठराव तहकूब करण्यात यावा यामुळे पुरवठा आदेश स्थगित ठेवण्यात आलेला होता. सदरच्या निविदेचा वैधता कालावधी दि. १ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपलेला असल्यामुळे संबंधीत कामाकरिता पुनःश्च नव्याने ई निविदाची प्रक्रिया करण्यास व त्यासाठी होणारा खर्च परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाची अंदाजपत्रकीय शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ (२)] | **दि.२५/०९/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.२५/०९/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S. ३३९ (F) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे.<br>सबब, दि.२५/०९/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.२५/०९/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृतांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ (३)] | १) व्यवस्थापन परिषदेचा सदस्य हा ज्या विषयामध्ये कार्यरत आहे किंवा तज्ज्ञ आहे त्याला त्या विभागातील विद्यापीठ उपक्रम व नियोजन, विकास आराखडा, कार्यक्रमामध्ये निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करावा, त्यांना निमंत्रित करावे असा ठराव मी व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करीत आहे.<br>२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आयोजित चर्चासत्रे, विविध व्याख्याने, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर उपक्रम, बक्षीस वितरण, अंतिम MoU निर्णय पत्रकार परिषद यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या सोयीनुसार निमंत्रीत करावे असा ठराव मी व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करीत आहे.<br>३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील नव्याने सुरु असलेल्या खेलो इंडिया अंतर्गत मल्टीपर्पज सभागृहाचे व वाढीव कामकाजाचे मूल्याकन तथा कंत्राटदाराला दिलेली देयके (रक्कम) अंदाजपत्रकाप्रमाणे व आराखड्यानुसार आहे का याची चौकशी व्हावी. यामध्ये व्यवस्थापन परिषद सदस्य दोन प्रतिनिधी व बांधकाम क्षेत्रातील तज्ज्ञ दोन आणि एक अधिसभा सदस्य अशी समिती गठीत करावी असा ठराव मी व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करीत आहे.<br>४) विद्यापीठ विकासासाठी आवश्यक विकास आराखडा, पदमान्यतेचे प्रस्ताव, विकास निधी शासनाकडून पाठपुरावा करणेसाठी मा. कुलपती कार्यालय तसेच मंत्रालयातील बैठकीसाठी किमान दोन व्यवस्थापन परिषद सदस्यांना प्रशासनाने मा.कुलगुरुंनी त्या समितीत / शिष्टमंडळात बरोबर घ्यावे असा ठराव मी व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करीत आहे.<br>५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील नूतन प्रशासकीय इमारत तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारक यांचे कामकाज निर्धारीत वेळेत पूर्ण झाली नाहीत त्यासाठी आपण कोणाला जबाबदार धरले त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केली का, याबाबत सभागृहास माहिती सादर करावी.<br>६) विद्यापीठातील नवसंशोधन, नवोपक्रम व सहचर्य विभागाला, कुलसचिव, अधिष्ठाता यांना शासनाकडे पूर्णवेळ मान्यता मिळूनही आजपर्यंत सदरच्या नेमणूका प्रभारी का आहेत. | आस्थापना विभाग/ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग/ अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद

## अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| अ.क्र. | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
|---|---|---|
| १) | प्रश्न १ | सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षात विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने मॅट खरेदी करताना निविदा प्रक्रिया राबविताना व पुर्ण झाल्यावर कोणी तक्रार केली आहे का? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षात विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकरिता मॅट खरेदी करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.<br>१) खरेदी करण्यात येणाऱ्या साहित्याची निविदाप्रक्रिया क्रीडा विभाग राबवित नाही.<br>२) खरेदी व भांडार विभाग यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार खरेदी व भांडार विभागाने राबविलेल्या मॅटच्या निविदा प्रक्रिये दरम्यान कोणीही तक्रार केली नाही.<br>३) खरेदी व भांडार विभागाकडून प्राप्त माहितीनुसार M/s D. Square Enterprises Meruth यांनी कुस्ती व खो-खो मॅटची ऑर्डर त्यांच्या फर्मला का मिळाली नाही याबाबत तक्रार केली. |
| | प्रश्न २ | आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात मार्गदर्शक व व्यवस्थापक नियुक्ती केल्यानंतर आयत्या वेळेस न गेलेल्या शारीरिक शिक्षण संचालकाच्या ठिकाणी कोणाची नियुक्ती केली आहे? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात मार्गदर्शक व व्यवस्थापक नियुक्ती केल्यानंतर आयत्या वेळेस न गेलेल्या शारीरिक शिक्षण संचालकाच्या ठिकाणी कोणाची नियुक्ती केली आहे याची माहिती सोबत जोडली आहे. (सहपत्र ११) |
| | प्रश्न क्र.३ | आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात मार्गदर्शक व व्यवस्थापक नियुक्त केल्यानंतर न गेलेल्या शारीरिक शिक्षण संचालकाची परत नियुक्ती केली आहे काय? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | सदर प्रश्नाचा बोध होत नसल्यामुळे माहिती अप्राप्त. |
| २) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न १ | विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या अनियमीत उपस्थितीबाबत विद्यापीठाने कोणकोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत? [पी.जी. प्रवेश विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालय यांना दि.२१/०६/२०२५ रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना ७५% उपस्थिती अनिवार्य असल्याचे कळविले होते. तसेच दि.३०/०६/२०२५ रोजीच्या संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यासमवेत झालेल्या बैठकीमध्ये मा.कुलगुरुमहोदय यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थिती LMS (Learning Management System) द्वारे Biometric प्रणालीद्वारे उपस्थितीबाबत नोंद करुन विद्यापीठाकडे Digital पध्दतीने पाठविण्याचे सूचना दिले आहे. त्यानुसार ऑक्टोबर २०२५ पर्यंत पी.जी. अभ्यासक्रमास ७५% विद्यार्थ्यांची उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरता येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. त्यानंतर पुढील टप्यात पदवी अभ्यासक्रमाकरीता LMS (Biometric) उपस्थिती नोंद घेण्यात यावे असे सूचना संबंधित महाविद्यालयांना दिली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न २ | विद्यापीठाची नवीन प्रशासकीय इमारत व खेलो इंडिया प्रकल्पाच्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात नवीन प्रशासकीय इमारतीचे ९५% बांधकाम पुर्ण झालेले असून सद्यस्थितीत किरकोळ रंगकाम टचअप व फरशी (Flooring) चे काम सुरु आहे व खेलो इंडिया प्रकल्पाचे ९५% बांधकाम पुर्ण झालेले असून सद्यस्थितीत रंगकामाचे टचअपचे काम सुरु आहे. |
| | प्रश्न ३ | विद्यापीठ परिसर व संलग्नित महाविद्यालयातील रिक्त असणाऱ्या शिक्षक पदभरती संदर्भात विद्यापीठ स्तरावर कोणते प्रयत्न झाले आहेत? याची सविस्तर माहिती मिळावी.<br>[आस्थापना विभाग / शिक्षक मान्यता विभाग] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील विविध संकुलात रिक्त असलेल्या पदांपैकी ०७ पदांची भरती प्रक्रिया करण्यास शासनाचे मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार विविध वर्तमान पत्रात, शासनाच्या संकेतस्थळावर व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अवेदन पत्र मागविण्यात आलेली आहेत. प्राप्त आवेदन पत्रांची छाननी झालेली असून विहीत कार्यपध्दतीनुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.<br>१) संलग्नित महाविद्यालयातील रिक्त नियमित प्राचार्य व शिक्षकांची पदे भरण्याबाबत विद्यापीठाचे पत्र जा.क्र.पुअहोसोविसो/शिमा/२०२४/७१९८, दि.१०/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठाच्या संलग्नित असलेल्या महाविद्यालयांना नियमित प्राचार्य व शिक्षकांची पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>२) तसेच महाविद्यालयातील रिक्त नियमित प्राचार्य पद भरणेबाबत महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य पदाच्या मान्यता पत्रामध्ये राज्य शासनाच्या दि.१०/०५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाविद्यालयातील रिक्त प्राचार्यांचे पद विद्यापीठ निवड समितीमार्फत भरण्याची तात्काळ कार्यवाही करावी असे कळविले जाते.<br>३) महाविद्यालयातील तासिका तत्वावर असलेल्या शिक्षकांचे स्थानिक निवड समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने (CHB) मान्यता पत्रामध्ये महाविद्यालयातील रिक्त नियमित शिक्षकांची पदे तात्काळ विद्यापीठाच्या विहीत निवड समितीमार्फत भरण्यात यावे असे कळविले जाते.<br>४) तसेच संलग्नता विभागातील विद्यापीठाच्या संलग्नित असलेल्या महाविद्यालयात स्थानिक चौकशी समिती महाविद्यालयास भेट देते तेव्हा नियमित शिक्षकांची पदे भरणेबाबत त्रुटी देखील कळविले जातात. त्याअनुषंगाने विद्यापीठाकडून नियमित पत्रव्यवहार देखील केला जातो. |
| ३) | श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न १ | विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सेवेत असलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी/अधिकारी यांनी पूर्णवेळ नियमीत हजर राहून पारंपारिक विद्यापीठांमधून (मुक्त विद्यापीठ वगळून) कायदा व अन्य अभ्यासक्रम पूर्ण केला आहे काय? असल्यास त्याचा संपूर्ण तपशिल मिळावा.<br>[आस्थापना विभाग / शिक्षक मान्यता विभाग] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठामध्ये सेवेत असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचारी / अधिकारी यांनी पूर्णवेळ नियमित हजर राहून पारंपारिक विद्यापीठांमधून (मुक्त विद्यापीठ वगळून) कायदा किंवा अन्य कोणताही अभ्यासक्रम पूर्ण केला नाही.<br>होय, विभागाकडील माहितीनुसार विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कला व वाणिज्य महाविद्यालय माढा येथील शिक्षक श्री. राजगुरु संतोष पुंडलिक, श्री. गोवर्धन कृष्णहरी दिकोंडा व श्री. विठ्ठल नामदेव शिंदे यांनी नियमित पूर्णवेळ सेवेत असताना प्रस्तुत विद्यापीठातून सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीमध्ये Regular mode मध्ये Law ची डिग्री पूर्ण केली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न २ | विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये नियमीत सेवेत असताना राज्यातील पारंपारिक विद्यापीठांमध्ये नियमीत अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो का? घेता येत नसल्यास पदवी पूर्ण केलेल्या व सध्या प्रवेशीत असणाऱ्या कर्मचाऱ्यावर विद्यापीठाने कोणती कारवाई केलेली आहे? त्याचा तपशील मिळावा. [आस्थापना विभाग / शिक्षक मान्यता विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुलातील नियमित अध्यापकांनी सेवेत कार्यरत असताना पारंपारिक विद्यापीठामूधन नियमित अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेला नाही. त्यामुळे माहिती निरंक समजण्यात यावी.**<br>**विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये नियमित सेवेत असताना राज्यातील पारंपारिक विद्यापीठांमध्ये नियमित अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येत नाही. परंतु महाविद्यालयात नियमित सेवेत असताना पदवी पूर्ण केली आहे, त्याच्यावर कारवाई सुरु आहे.** |
| | प्रश्न ३ | विद्यापीठातील नवीन प्रशासकीय इमारतीसमोरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारकाचे बांधकाम व इतर सजावटीचे काम पूर्ण झाले आहे काय? त्याचबरोबर स्मारकाच्या निर्मीतीसाठी आज अखेर झालेल्या खर्चाचा तपशील मिळावा. [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठातील नवीन प्रशासकीय इमारतीसमोरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारकाचे बांधकाम व इतर सजावटीचे काम ८०% ते ९०% पूर्ण झाले आहे.**<br>**स्मारकाच्या निर्मितीचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून सुरु असून सदर कामासाठी निधी शासनस्तरावर सार्वजनिक बांधकाम विभागास देण्यात येत आहे. त्यामुळे सदर कामासाठी आज अखेर झालेल्या खर्चाचा तपशिल विद्यापीठाकडे उपलब्ध नाही.** |
| ४) | डॉ. अनिल अर्जुन घनवट | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न १ | विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी विद्यापीठ कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबवित आहेत? त्यासाठीची अंदाजपत्रकीय तरतुद किती केली आहे याचा तपशिल मिळावा. [आस्थापना विभाग (शिक्षक कक्ष)] |
| | उत्तर | **विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी विद्यापीठ कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.**<br>Establishment Section १) Financial Assistance to Regular Teachers / Contract Basis Teachers, Administrative Officers / Staff for International Conference: Rs.१०,००,०००/-<br>२) Conference / Seminar TA/DA for Adm. Staff & University Teachers: Rs.२,००,०००/-<br>**३) विद्यापीठातील शिक्षक कर्मचारी (अध्यापक) यांना मेडीक्लेम सुविधा पुरविण्यात येते.** |
| | प्रश्न २ | विद्यापीठातील नियमित कार्यरत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी यांच्याकरिता आरोग्य विमा योजनेमध्ये त्यांच्या पालकांचा समावेश आहे काय? समावेश नसल्यास त्यांना या योजनेमध्ये सामाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाने धोरणात्मक निर्णय घेण्याचे योजले आहे काय? [आरोग्य केंद्र] |
| | उत्तर | **विद्यापीठातील नियमित कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी यांच्याकरता आरोग्य विमा योजनेमध्ये त्यांच्या पालकांचा समावेश नाही.**<br>**सद्यस्थिती मध्ये सदर आरोग्य विमा योजनेमध्ये विद्यापीठातील नियमित कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी यांच्या पालकांना समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाने कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्याचे योजलेले नाही.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड |
| | प्रश्न १ | शिक्षक व कर्मचाऱ्यांचा Service Book हा त्यांचा मूलभूत हक्क असूनही काही महाविद्यालयांनी तो अद्याप दिलेला नाही - या स्पष्ट दुर्लक्ष व अन्यायावर विद्यापीठाने तातडीने कोणती कारवाई केली आहे आणि जबाबदार महाविद्यालयांवर कडक कार्यवाही कधी करणार? [शिक्षक मान्यता विभाग] | |
| | उत्तर | १) विभागाकडील प्राप्त माहितीनुसार डॉ. सुनिलकुमार शंकरराव पाटील यांच्या दि.१६/०६/२०२५ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने सदर तक्रार ही संस्था/महाविद्यालयीन स्तरावरील असल्याने सदर प्रकरणी योग्य ती कार्यवाही करुन त्याचा अहवाल प्रस्तुत विद्यापीठास सादर करण्याबाबत मा.प्राचार्य, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर यांना प्रस्तुत विद्यापीठाचे जा.क्र.पुअहोसोविसो/शिमा-१/२०२५/५६८६, दि.१६/०७/२०२५ अन्वये कळविलेले आहे.<br>२) डॉ. संजय नाईनवाड, डॉ. हरीसिंह गौर विश्वविद्यालय, सागर (म.प्र.) यांच्या दि.२३/०८/२०२५ रोजी विद्यापीठास माहितीस्तव पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने डॉ. संजय नाईनवाड, सहयोगी प्राध्यापक यांचे पद व सेवांचा तांत्रिक राजीनामा दिल्यानंतरचे तद्नुषंगिक सेवाविषय व आर्थिक लाभ वर्ग करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ विद्यापीठास सादर करण्याबाबत मा. प्राचार्य, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी यांना प्रस्तुत विद्यापीठाचे जा.क्र.पुअहोसोविसो/शिमा-२/२०२५-२६/७४९३, दि.२३/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. | |
| ६) | ॲड. सुनंदा करण भगत | | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न १ | विद्यापीठाच्या पॅनल वर किती वकील आहेत आणि त्यांच्या कामाची विभागणी कशी होते? [कायदा विभाग] | |
| | उत्तर | विद्यापीठाच्या पॅनलवर एकूण ३५ वकील आहेत. विविध न्यायालयीन प्रकरणास अनुसरुन कामाची विभागणी करण्यात येते. | |
| | प्रश्न २ | पेट ९ ची सध्या स्थिती काय आहे? [संशोधन विभाग] | |
| | उत्तर | पेट-९ (२०२४) साठी ५०५ रिक्त जागांकरीता प्रवेश प्रक्रिया होवून दोन फेऱ्यांमध्ये ४४५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक वितरीत करण्यात येवून, त्यांचे शिर्षक अंतिम करुन प्रवेश पत्र देण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधीत संशोधन केंद्रावर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.<br>विद्यापीठ नियमावलीनुसार वर्षातून एक वेळा पेट घेवून दोन वेळा प्रवेश प्रक्रिया करण्याबाबत उल्लेख असल्याने द्वितीय सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरीताच्या नियमावलीस विद्यापरिषदेने मान्यता दिली असून, सदर नियमावलीनुसार नव्याने रिक्त जागांची माहिती मागविण्यात येवून विषयनिहाय आरक्षण तपासण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रवेश प्रक्रिया ही केवळ यापूर्वी पेट-९ (२०२४) करीता अर्ज केलेले व पात्र विद्यार्थ्यांसाठीच राबविण्यात येत आहे. | |
| (७) | श्री. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | | श्री. महादेव धरेप्पा कमळे |
| | प्रश्न १ | मागील शैक्षणिक वर्षात कमवा व शिका योजनेचा लाभ किती विद्यार्थ्यांनी घेतला आणि किती रक्कम वितरित करण्यात आली? [विद्यार्थी विकास विभाग] | |
| | उत्तर | मागील शैक्षणिक वर्षात कमवा व शिका योजनेचा लाभ एकूण १०४ विद्यार्थ्यांनी घेतला असून त्याकरीता एकूण रक्कम रु.१४,४३,१२०/- इतकी वितरीत झाली आहे. | |
| | प्रश्न २ | वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय काय आहे? [विद्यार्थी विकास विभाग] | |
| | उत्तर | दर करार करण्याची प्रक्रिया वित्त व लेखा विभागाकडून (केंद्रीय खरेदी) सुरु आहे. | |

| | | |
|---|---|---|
| ८) | श्रीमती शोभा एल. बोल्ली | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे |
| | प्रश्न १ | कम्युनिटी रेडिओ स्थापन करणे बाबतची स्थिती काय आहे? [सामाजिकशास्त्रे संकुल] |
| | उत्तर | **सदर कम्युनिटी रेडिओच्या प्रस्तावा संदर्भात I.Q.A.C. ने समिती गठीत केली. त्या अनुषंगाने समितीची बैठक संपन्न झाली व कम्युनिटी रेडिओ संदर्भातील प्रस्तावाचा प्राथमिक मसूदा तयार झाला आहे.** |
| ९) | ॲड. नीता सुरेशबाबू मंकणी | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न १ | सायन्स अँड टेक्नॉलाजी समतुल्यता संदर्भातील विद्यापीठाचा निर्णय हा UGC नियमावलीला अनुसरुन आहे का? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | **सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी या विद्याशाखेतील कोणत्या विषयांच्या संदर्भात समतुल्यता विचारण्यात आली आहे व कोणत्या विषयाची समतुल्यता UGC नियमावलीला अनुसरुन आहे का याबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाचा अर्थबोध होत नाही.** |
| | उपप्रश्न १ | UGC कडून मान्यता न घेतल्यास याचा अर्थ विद्यापीठाने UGC नियमांचे उल्लंघन केले, असे मानावे का? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | **मूळ प्रश्नाचे अर्थबोध होत नसल्याने उत्तर निरंक.** |
| | उपप्रश्न २ | या संदर्भातील सर्व UGC मान्यता पत्रे, पत्रव्यवहार व कागदपत्रे त्वरित सीनेट समोर सादर करन्यास काही अडचण आहे का? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | **मूळ प्रश्नाचे अर्थबोध होत नसल्याने उत्तर निरंक.** |
| | प्रश्न २ | अलिकडील दीक्षांत समारंभामध्ये एकूण १०,९५५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले असे जाहीर करण्यात आले, हे खरे आहे का? [परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत)] |
| | उत्तर | **संलग्नित महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभामध्ये पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात येत नाहीत, सदर प्रमाणपत्राचे वितरण २०१८ चा एकरुप परिनियम क्र.४ अन्वये मुद्दा क्र.३ मधील ०८ व ०९ नुसार करण्यात येते.** |
| | उपप्रश्न १ | प्रत्यक्षात या सर्व प्रमाणपत्रांचे वितरण झाले आहे का व अजून किती प्रमाणपत्रे *छापून तयार* झाली नाहीत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत)] |
| | उत्तर | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने २०१८ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील मुद्दा क्र.३(८) व (९) नुसार पदवी प्रमाणपत्र महाविद्यालय स्तरावरुन विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येतील.** |
| | उपप्रश्न २ | विद्यापीठाकडे तयार असूनही *विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात वाटप झालेले नाहीत* अशी किती प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत)] |
| | उत्तर | **अशी कोणतेही प्रमाणपत्र विद्यापीठाकडे प्रलंबित नाहीत.** |
| १०) | श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | श्री. महादेव धरेप्पा कमळे |
| | प्रश्न १ | विद्यापीठातील Girls hostel Rector व Warden यांची नावे कोणती आहेत? [विद्यार्थी विकास विभाग] |
| | उत्तर | **मुलींच्या वसतिगृहाचे अधिक्षक म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक आहेत. तसेच गृहपाल म्हणून १) सविता हरीभाऊ बनसोडे २) श्रीमती सत्यशिला दत्तात्रय घोंगडे हे आहेत.** |
| | प्रश्न २ | त्यांच्या निवासासाठी विद्यापीठाने कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत का? [विद्यार्थी विकास विभाग] |
| | उत्तर | **गृहपाल यांच्या निवासासाठी वसतिगृहामध्ये प्रत्येकी स्वतंत्र खोली उपलब्ध करुन दिली आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ११) | श्री. सुदर्शन मसु यादव | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| | प्रश्न १ | विद्यापीठात लाकडी, लोखंडी, इलेक्ट्रिक, पलंबिग चे काम करण्यासाठी कायम कर्मचारी असताना साहित्य नादुरुस्त स्वरुपात पडून आहे. ते काम वेळेत का होत नाही त्या कामाचे परीक्षण आणि work ऑडिट होते का? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठात लाकडी, इलेक्ट्रिक, प्लंबिंगचे काम करण्यासाठी कायम कर्मचारी असून ज्या त्या विभागाच्या मागणीनुसार ज्या त्या विभागातील लाकडी, इलेक्ट्रिक, प्लंबिंग संबंधित (Maintenance) दुरुस्तीची कामे वेळोवेळी आवश्यक साहित्य खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यतेअंती साहित्य खरेदी करुन संबंधित विभागातील (Maintenance) दुरुस्तीची कामे केली जातात. सदरच्या कामाचे परीक्षण कनिष्ठ अभियंता व विद्यापीठ अभियंता यांच्याकडून होते. सदर कामाचे work ऑडीटची तरतूद नाही.** |
| | प्रश्न २ | विद्यापीठ कायम शिक्षक यांच्या कडे शिक्षण आणि संशोधन व्यतिरिक्त कोणते अतिरिक्त कार्यभार दिले आहेत? उपलब्ध मनुष्य बळानुसार कार्यव्यवस्थापन केले आहे का? [आस्थापना विभाग (शिक्षक कक्ष)] |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील विविध संकुलात कार्यरत असलेल्या शिक्षकांकडे अध्यापनाचे आणि संशोधनाचे कामाव्यतिरिक्त अधिकचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. संचालक पदाचा कार्यभार, विभाग प्रमुख पदाच कार्यभार, विविध अध्यासन केंद्राचे कामकाज व शासनाच्या निर्देशानुसार विविध घटकासाठी तज्ज्ञ म्हणून नोडल ऑफिसर म्हणून मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार अध्यापनाचे व संशोधनाचे कामकाज पाहून अधिकचे संबंधित कामकाज सोपविण्यात आलेले आहे.** |
| १२) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न १ | हॉकी असोसिएशन आणि MCA सोबत कोणता सामंजस्य करार झालेला आहे? त्याची सविस्तर माहिती द्यावी. [नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ] |
| | उत्तर | **हॉकी असोसिएशन आणि MCA सोबत कोणताही करार झालेला नाही. सदर प्रश्नाबाबत माहिती निरंक आहे.** |
| | प्रश्न २ | नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करिता किती वेळा मुदत वाढ दिली गेली? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारत बांधकामास ५ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे.** |
| १३) | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे |
| | प्रश्न १ | दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठ पदवीदान समारंभासाठी किती पदवी प्रमाणपत्रे छापण्यात आली आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत)] |
| | उत्तर | **दि.१८ सप्टेंबर, २०२५ रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठ पदवीदान समारंभासाठी ११,२६७ पदवी प्रमाणपत्रे छापण्यात आली.** |
| | प्रश्न २ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये सद्यस्थितीत सुरु करण्यात आलेल्या ऑनलाईन संलगणीकरण प्रक्रियेस कोणत्या प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आली आहे? [संलग्नता विभाग] |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये सद्य:स्थितीत सुरु करण्यात आलेल्या ऑनलाईन संलग्निकरणासंदर्भात माहिती व तंत्रज्ञान मंडळाची आणि व्यवस्थापन परिषदेची मंजूरी घेण्यात आली आहे.** |
| | प्रश्न ३ | पीएम उषा अंतर्गत खरेदी प्रक्रिये संदर्भातील विविध निविदा का रद्द करण्यात आल्या? [पीएम-उषा विभाग] |
| | उत्तर | **पीएम-उषा योजने अंतर्गत कोणतेही निविदा रद्द करण्यात आलेले नाही.** |

| | | |
|---|---|---|
| १४) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न १ | २०२३-२४ च्या कंत्राटी शिक्षक भरती मधील अनियमितेबाबत नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल सिनेट समोर केव्हा सादर करण्यात येणार आहे? [आस्थापना विभाग (शिक्षक कक्ष)] |
| | उत्तर | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या कंत्राटी सहायक प्राध्यापक पदाच्या भरती प्रक्रियेसंदर्भात नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.** |
| | प्रश्न २ | २४ सप्टेंबर २०२४ रोजी च्या सिनेटमध्ये पीएच डी थेअरी परीक्षेसंदर्भात नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल येण्या अगोदरच सदर व्यक्तींना पीएच डी पदवी का बहाल करण्यात आली? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **२४ सप्टेंबर २०२४ रोजी च्या सिनेटमध्ये पीएच डी थेअरी परीक्षेसंदर्भात कोणतीही समिती नेमलेली नाही.** |
| | प्रश्न ३ | दिनांक ३१ मे २०२५ रोजी पीएम उषा योजने अंतर्गत कामाचे भूमिपूजन पायाभरणी कार्यक्रमावेळी होमहवन करण्यात आले काय? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **नाही, पीएम-उषा योजनेअंतर्गतची कामे सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे.** |
| १५) | प्रा. डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न १ | एनआयआरएफ रॅंकिंग २०२५ मध्ये प्रस्तुत विद्यापीठास किती गुण मिळाले आहेत? [सांख्यिकी विभाग] |
| | उत्तर | **एनआयआरएफ रॅंकिंग २०२५ मध्ये प्रस्तुत विद्यापीठाने सहभाग नोंदविला असून विद्यापीठास एनआयआरएफ रॅंकिंग २०२५ मध्ये क्रमांक प्राप्त झाले नाही. एनआयआरएफ रॅंकिंगमध्ये देशातील १०० विद्यापीठांची यादी गुणानुक्रमे प्रकाशित केली जाते.** |
| | प्रश्न २ | मार्च २०२५ च्या BSc I, II, III च्या विद्यापीठ प्रात्यक्षिक परीक्षा वर्गनिहाय कोणत्या तारखेस सुरु झाल्या व कोणत्या तारखेस पूर्ण झाल्या? [परीक्षाकालीन विभाग] |
| | उत्तर | **मार्च २०२५ च्या BSc I, II, III च्या प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठ जा.क्र.PAHSUS/BOEE/SCI/२०२५/५९८, दि.११/०४/२०२५ च्या परिपत्रकानुसार थेरी परीक्षेच्या पूर्वी किंवा नंतर आयोजित करणेबाबत कळविण्यात आले होते.** |
| | प्रश्न ३ | आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी संघ प्रशिक्षक व संघ मार्गदर्शक पदी नियुक्ती करण्यासाठी कोणती पात्रता आवश्यक आहे? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | **निवड समितीतील सदस्य हे संघ प्रशिक्षण व संघ मार्गदर्शक म्हणून काम पाहतात. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व प्राध्यापक हे प्रशिक्षक व संघ मार्गदर्शक म्हणून पात्र आहेत.** |
| १६) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड |
| | प्रश्न १ | सद्यस्थितीत किती अभ्यासमंडळावरील अध्यक्ष/ समन्वयक यांची मुदत संपलेली आहे? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | **सोबत यादी जोडली आहे. (सहपत्र १२)** |
| | प्रश्न २ | २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये स्थायी समितीच्या किती बिअठ्का घेण्यात आल्या? [सभा व निवडणूका विभाग] |
| | उत्तर | **स्थायी समितीची बैठक दि.०४ सप्टेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेली आहे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रश्न ३ | मार्च २०२५ च्या सैद्धांतिक व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यापीठ कायदा २०१६ मधील ४८(३) या कलमाचे उल्लंघन करुन किती परीक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या? [परीक्षाकालीन विभाग] | |
| | उत्तर | **मागील चार वर्ष प्रात्यशिक परीक्षा महाविद्यालय स्तरावरुन होत होत्या. तरी प्रथमच मार्च २०२५ च्या सैध्दांतिक व प्रात्यशिक परीक्षेसाठी विद्यापीठ कायदा २०१६ मधील ४८(३) या कलमानुसारच नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.** | |
| १७) | डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी | | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित किती महाविद्यालयांचे NAAC / NBA मुल्यांकन झाले आहे? [संलग्नता विभाग] | |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित ६९ महाविद्यालयांचे NAAC / NBA मूल्यांकन झाले आहे.** | |
| १८) | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न १ | मार्च २०२२, २०२३, २०२४ व २०२५ मधील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ॲडऑन कोर्स सर्टिफिकेट्स विद्यापीठाकडून वितरित झाली आहेत काय? [परीक्षाकालीन विभाग] | |
| | उत्तर | **विद्यापीठ जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूम/२०२५/१४१३, दि.२४/०७/२०२५ नुसार मार्च २०२२, २०२३, २०२४ व २०२५ मधील Add on Course चे प्रमाणपत्र ज्या महाविद्यालयांनी Add on Course चे मार्क दिलेले आहेत व प्रमाणपत्राचे शुल्क जमा केलेल्या पावत्या दिलेल्या आहेत. अशा महाविद्यालयांना प्रमाणपत्र छपाई करण्याची प्रक्रिया चालू आहे.** | |
| १९) | ॲड. उषा नंदकुमार पवार | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न १ | माननीय संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या मनमानी व बेकायदेशीर कामकाजाची चौकशीबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे? [आस्थापना विभाग] | |
| | उत्तर | **अधिसभेने केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने दि.०३ जून, २०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये सदरचा विषय ठेवण्यात आला होता. सदर विषयाच्या अनुषंगने अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस सर्वानुमते अमान्य करण्यात आली आहे.** | |
| | प्रश्न २ | एडूलॅब सॉफ्टवेअर बरोबरच्या करारपत्रकामध्ये या सॉफ्टवेअरकडून झालेल्या चुकांबाबत संबंधित सॉफ्टवेअरवर कारवाई करण्यासंदर्भात काय तरतूद आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | **करारपत्रकामधील अ.क्र.१३ नुसार कार्यवाही करण्याची तरतूद आहे. (सहपत्र १३ ते १४)** | |
| | प्रश्न ३ | विद्यापीठाच्या सद्या कार्यरत असलेल्या बोर्ड ऑफ स्पोर्ट्स (क्रीडा मंडळ) च्या सदस्य पदावर नियमबाह्य नियुक्ती करण्यात आली आहे काय? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] | |
| | उत्तर | **विद्यापीठाच्या सध्या कार्यरत असलेल्या बोर्ड ऑफ स्पोर्टस (क्रीडा मंडळ) च्या सदस्य पदावर नियमबाह्य नियुक्ती करण्यात आली नाही.** | |
| २०) | डॉ. विकास दादाभाऊ कड्डू | | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न १ | विद्यापीठाच्या ४८२ एकरातील नवीन प्रशासकीय इमारत, खेलो इंडिया इमारत व पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारक या तीनही प्रकल्पाकडे जाण्यास आवश्यक असणाऱ्या Approach Road ची प्रक्रिया विद्यापीठाने केली आहे काय? केली असल्यास त्याचा तपशील मिळावा. [अभियांत्रिकी विभाग] | |
| | उत्तर | **हो, विद्यापीठाच्या ४८२ एकरातील तिन्ही इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्याकरीता मा. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ५० लाखाची तरतूद करुन जिल्हा परिषद विभागाकडून DPDC अंतर्गत Approach Road तयार करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.** | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

Nahd-

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न २ | विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत ग्रंथ खरेदीसाठी विद्यापीठाने मानक कार्य प्रणाली (SOP) तयार केली आहे काय? त्याची सविस्तर माहिती मिळावी. [कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र] |
| | उत्तर | उपरोक्त विषयान्वये प्रस्तुत विद्यापीठातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत ग्रंथ खरेदी करण्यासाठी विद्यापीठाने मानक कार्य प्रणाली (SOP) खालीलप्रमाणे तयार केली आहे.<br>१) विद्यार्थ्यांकरिता पुस्तके खरेदीसाठी संकुल संचालकांकडून शिफारस केलेल्या पुस्तकांची यादी ज्ञानस्त्रोत केंद्रास प्राप्त झाल्यानंतर, उपलब्ध पुस्तकांची संख्या लक्षात घेवून पुस्तकांची खरेदी करण्यात येते.<br>२) प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या अधिकृत पुस्तक विक्रेत्याकडूनच पुस्तकांची खरेदी करण्यात येते.<br>३) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने प्रकाशनाच्या प्रकारानुसार मान्य केलेल्या डिस्काऊंट दरानुसार पुस्तके खरेदीची प्रक्रिया राबवली जाते.<br>४) खरेदी केलेली पुस्तके ज्ञानस्त्रोत केंद्रास प्राप्त झाल्यानंतर त्यांची तपासणी (शिर्षक, आवृत्ती) केली जाते. पुस्तके ग्रंथालयाच्या नोंदवही व सॉफ्टवेअरमध्ये नोंदवली जातात. |
| | प्रश्न ३ | विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयामधील प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता केंद्र व राज्य शासन आणि विद्यापीठामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध योजना इत्यादींचा सविस्तर तपशिल द्यावा?<br>[विद्यार्थी विकास विभाग / पी.जी. प्रवेश विभाग/राष्ट्रीय सेवा योजना विभाग] |
| | उत्तर | विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यापीठ संकुलातील विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेचा लाभ देण्यात येतो. प्रती तास रु.६०/- प्रमाणे दोन तासाचे त्यांना मानधन अदा करण्यात येते. तसेच सन २०२५-२६ या वर्षापासून महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त स्वामी विवेकानंद विद्यार्थी अपघात विमा योजना राबविण्यात येत आहे.<br>विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामधील प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता महाराष्ट्र शासनाकडून Maharashtra State Government Scholarship Scheme तसेच केंद्र शासनाकडून Central Government Scholarship Scheme मधील विविध शिष्यवृत्ती योजनेकरीता विद्यार्थ्याकडून Mahadbt व NSP Portal मधून प्राप्त अर्जानुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर कार्यवाही केली जाते. तसेच विद्यापीठ संकुलामध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थिनीकरीता विद्यापीठ निधीमधून "मुली शिकवा समाज घडवा" अंतर्गत शिष्यवृत्ती योजनेमधून पात्रताधारक विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती अदा करण्यात येते.<br>१) कमवा व शिका (विद्यापीठ)<br>२) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण (विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय)<br>३) व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण (विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय)<br>४) साहसी शिबीर (विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय)<br>५) एड्स जनजागृती अभियान (विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय)<br>६) राज्य / राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबीरात सहभाग (राज्य, राष्ट्रीय)<br>७) राष्ट्रीय एकात्मता शिबीरात सहभाग (राष्ट्रीय राज्य)<br>८) नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीर (विद्यापीठ, राष्य, राष्ट्रीय)<br>९) सामाजिक-सांस्कृतिक विविध स्पर्धा (राज्य)<br>१०) डिजीटल साक्षरता प्रशिक्षण (विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय) |

***